दि. ११.०९.२०१४

# वृत्तपत्र वार्ता

## ‘कोराडी प्रकल्पाच्या संच क्र. ८ (६६० मे. वॅट) चे ‘बॉयलर प्रदिपन’ संपन्न’

कोराडी विस्तारित प्रकल्पातील पहिला संच (संच क्र. ८) चे ‘बाष्पक प्रदिपन’ (Boiler Light-up) दिनांक ११ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी ९.४५ वाजता यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. संच क्र. ८ चे क्रियान्वयन (Synchronization) नोव्हेंबर २०१४ मध्ये अपेक्षित आहे. हा संच पूर्ण क्षमतेने डिसेंबर २०१४ मध्ये कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. तसेच या प्रकल्पातील अनुक्रमाने संच क्र.९, १० बाष्पक प्रदिपन नोव्हेंबर २०१४ व एप्रिल २०१५ मध्ये अपेक्षित आहे. या प्रसंगी मा. श्री. आशिष शर्मा, (IAS) व्यवस्थापकिय संचालक (महानिर्मिती) यांनी नियंत्रण कक्षातून कळ दाबून बाष्पक प्रदिपन केले. सदर बाष्पक प्रदिपन सोहळयास मा. श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (प्रकल्प) प्रामुख्याने उपस्थित होते व त्यांनी नियोजीत कालावधीत प्रकल्प पूर्ण करण्यास मौलिक सूचना दिल्या. कोराडी प्रकल्पातील संच क्र. ८, ९ व १० चे पूर्णपणे क्रिर्यान्वयन झाल्यानंतर उपलब्ध संसाधनांचा सुजाण व सुयोग्य वापर करुन महानिर्मितीतर्फे लवकरच क्षमता विस्ताराधारे वाढती विजेची मागणी पूर्ण करण्यात येईल, असा दृढ विश्वास या प्रसंगी व्यक्त करण्यात आला.

कोराडी विस्तारित प्रकल्पाची स्थापित होणारी एकूण क्षमता १९८० मे. वॅट इतकी आहे. तिनही संचाचे काम प्रगती पथावर असून टप्प्याटप्प्याने या संचाचे क्रियान्वयन करण्यात येणार आहे. मार्च २०१५ पर्यंत संच क्र ८ व ९ असे एकूण १३२० मे. वॅट संचाचे क्रियान्वयन करण्याचे नियोजन असून उर्वरित एक संचाचे काम वर्ष २०१५-१६ च्या तिमाही काळात क्रियान्वयन होणे अपेक्षित आहे. अशाप्रकारे महानिर्मिती कंपनीच्या विज निर्मिती क्षमतेत वाढ होणार आहे.

राज्यातील “सुपर क्रिटिकल” तंत्रज्ञानावर आधारित महानिर्मितीचा हा पहिला प्रकल्प आहे. प्रामुख्याने संचाची कार्यक्षमता जास्त असून कोळशाचा वापर कमी होऊन प्रदूषण नियंत्रित होणार असून पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल. जपानचे तंत्रज्ञान वापरुन बॉयलर व टर्बाईन उभारण्याचे काम मे. एल ॲन्ड टी व उर्वरित काम मे. लॅन्को करित आहे.

सदर प्रसंगी श्री. आशिष शर्मा व्यवस्थापकिय संचालक व श्री. चंद्रकांत थोटवे,संचालक (प्रकल्प) यांनी सर्व अभियंते, कर्मचारी प्रमूख कंत्राटदार व उपकंत्राटदार व इतर सर्वाचे अभिनंदन केले व संचाचे क्रियान्वयन त्वरेने करण्याच्या सूचना दिल्या.

या प्रमुख कार्य प्रसंगी मुख्य अभियंते सर्वश्री पंकज सपाटे, प्रदिप शिंगाडे, प्रमोद नाफडे, सीताराम जाधव व उमाकांत निखारे, उपमुख्य अभियंते संजय मारुडकर, संजय काशीकर, धैर्यधर खोब्रागडे, समस्त वरिष्ठ अभियंते, अधिकारी, तंत्रज्ञ व कर्मचारी-गण उपस्थित होते. या प्रसंगी ई. पी.सी अंतर्गत मे. एल ॲन्ड टी आणि मे. लॅन्को यांचे वरिष्ठ अभियंते, अधिकारी उपस्थित होते. श्री. पंकज सपाटे मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी समस्त मान्यवर व अभियंते, अधिकारी, तंत्रज्ञ, कर्मचारी, कंत्राटदार व स्थानिक नागरिकांचे मनःपुर्वक आभार मानले.